# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 04/09/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावर मौजा गुजरखेडी वाघोडा येथे ते दिनांक 03/09/2020 चे 12.30 वा. फिर्यादी नामे– प्रविण सुधाकर डोंगरे, वय 30 वर्ष, रा. न्यु गुजरखेडी वाघोडा, सावनेर व त्यांची आई घरी हजर नसतांना आरोपी नामे– विनोद यदुवंशी, वय 32 वर्ष, रा. न्यु गुजरखेडी वाघोडा, सावनेर याने फिर्यादीच्या घराच्या मागील दाराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरामधील स्वयंपाक खोलीमध्ये ठेवलेली लोखंडी कपाटातुन सोन्या–चांदीचे दागिने कि. 20,500/–रू. व नगदी 4,000/–रू. असा एकुण कि. 24,500/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मेश्राम, पोस्टे सोवनर 9222545169 हे करीत आहे.

### ट्रॅक्टर चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 5 किमी अंतरावर माथनी शेतशिवार ता. कामठी येथे दिनांक 02/09/2020 चे 19.00 वा. ते दिनांक 03/09/2020 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. संगिता वामन पिसे, वय 40 वर्ष, रा. माथनी ता. मौदा, जि. नागपूर या शेतातील काम आटोपुन घरी आल्या व एमएच–40/एल–4445 क्रमांकाचा ट्रॅक्टर शेतात ठेवला होता. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या किंमती 2,00,000/– रु. चा ट्रॅक्टर ट्राली काढुन चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे 9764007720 हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 किमी अंतरावर गळपुरा काटोल येथे दिनांक 03/09/2020 चे 09.00 वा. ते 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विशाल किसनराव शिंगणापुरे वय 19 वर्ष रा चिचाळा नायगाव हा आपले भावाची एमएच–40/बीएक्स–4692 क्रमांकाची एचएफ डिलक्स मोटरसायकल घेवुन काटोल येथे आला असतांना आरोपी नामे– शंकर गणपतराव ढोके, वय 35 वर्ष, रा अर्जुन नगर, काटोल याने त्यास आयुडीपी काटोल येथे नेले व तेथुन फिर्यादीला बाजुला थाबंण्यास सांगितले. त्या दरम्यान आरोपीने फिर्यादी जवळील माटरसायकल किमंती 50,000/– रू. ची घेवुन निघुन गेला व तो मोटरसायकल घेवुन जात असतांना त्यास फिर्यादी व त्याचे सोबतचे इसमाने मेढेपठार गावात मिळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379, 511 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे 8380833424 हे करीत आहे.

# गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर मौजा सावंगी, बसस्टॅन्ड समोर येथे दिनांक 02/09/2020 चे 22.00 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) नितीन ज्ञानेश्वर वाघमारे, 2) मधुकर तुकाराम खांडेकर, 3) सुधाकर तुकाराम खांडेकर, 4) भुषन बेलसरे व 5) मधुकर खांडेकर याचा साळभाउ व त्याचे दोन मित्र यांनी जुण्यावादाच्या कारणावरून एकत्र गैरकायदयाची मडंळी गोळा करून फिर्यादी व फिर्यादीचे मित्र यास लाथाबुक्कीने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितीन परसराम राउत, वय 31 वर्ष, रा. वार्ड क्र 3 सावंगी कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,146,147,149,323 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ नागपूरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर